# The Scrum Values

## Marathi Version (2021)



# Dear reader

*Scrum is based on a set of fundamental values. These values are the bedrock on which Scrum's practices rest.*

The Scrum Values were first described by Ken Schwaber and Mike Beedle in their book "Agile Software Development with Scrum" (Prentice Hall, 2002 - chapter 9, p. 147). They describe the Scrum Values as 'qualities' that they found that people using Scrum display: Commitment, Focus, Openness, Respect, and Courage.

Towards the end of 2012, an attendant of one of my Professional Scrum classes (a candidate-trainer actually) asked me about the relevance of the Scrum Values. I realized that they had indeed over time faded, although I did personally consider them important. I checked in with Ken Schwaber and he agreed: still the bedrock despite having disappeared from the radar.

It was clear that there was value in the Scrum Values and in describing them. So, that is what I did on my website. I then also added that description to my book "Scrum - A Pocket Guide" (Van Haren Publishing, 2013). In 2016 they were added to the Scrum Guide. In 2018-2019 members from the global Scrum communities translated my description in 20+ languages.

Since 2012 I have only slightly evolved the words to describe the Scrum Values, like when creating the second and third edition of my pocket guide to Scrum (2019 and 2021). I am honoured and humbled for the continued appreciation of my description.

I gladly share them in this document that can be downloaded from thescrumvalues.org, the website that I dedicated to the Scrum Values.

I am grateful to Mahesh Jade and Rahul Jade for creating this Marathi version.

Keep learning,
Keep improving,
Keep…Scrumming.

**Gunther Verheyen**
independent Scrum Caretaker

Scrum.
Period

# Marathi / मराठी - स्क्रम ची तत्वे

वेळ आणि संदर्भानुसार योग्य असेल अशी कार्य प्रक्रिया लोक आणि संस्थांसाठी विकसित करण्यासाठी एक फ्रेमवर्क तयार केला गेला आहे तो स्क्रम. नियमितपणे तपासणी आणि अनुकूलन प्रक्रियेतून जाण्यासाठी स्मरणपत्रे सेट करतो ते स्क्रम. स्क्रम अशा अनुभवात्मक प्रक्रिया नियंत्रण, उर्फ अनुभववाद लागू करतो, कारण अप्रत्याशित, गुंतागुंतीच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी हा सर्वोत्तम अनुकूल दृष्टीकोन आहे. स्क्रमच्या हद्दीत लोक स्वयंचलितपणे आयोजन करतात. बाह्य कार्य योजना किंवा त्यांच्यावर लादलेल्या सूचनांशिवाय त्यांच्या समस्या आणि आव्हानांच्या आसपास ते संघटित गट तयार करतात. अनुभववाद आणि स्वयंचलन स्क्रमचा डीएनए बनवते. स्क्रमचे सर्व नियम आणि तत्त्वे त्यात रुजलेली आहेत.




आणि तरीही, नियम व तत्त्वांपेक्षा स्क्रममध्ये आणखी बरेच काही आहे. स्क्रम, प्रत्यक्षात, प्रक्रियेपेक्षा व्यवहाराबद्दल अधिक आहे. स्क्रमची चौकट पाच मुख्य मूल्यांवर आधारित आहे: वचनबद्धता, लक्ष, मोकळेपणा, आदर आणि धैर्य. जरी या मूल्यांचा शोध स्क्रमच्या भागाच्या रुपात झाला नव्हता आणि केवळ स्क्रमसाठीच नाहीए, परंतु ते स्क्रममधील कार्य, वागणूक आणि कृती (लोकांच्या पार्श्वभूमी, जटिलता आणि अनुभववाद विरोधात योग्यरित्या समजल्या गेल्यास) दिशा देतात. स्क्रम संदर्भात, आमचे निर्णय, आपण घेतलेली पावले, खेळ खेळण्याची पद्धत, समाविष्ट केलेल्या पद्धती आणि केलेले उपक्रम यांमध्ये या मूल्यांची पुन्हा अंमलबजावणी केली पाहिजे, ती कमी किंवा लहान करु नये. कारण, शेवटी, स्क्रमच्या नियमांपेक्षा, स्क्रमद्वारे प्राप्त झालेले फायदे स्क्रमवर काम करणाऱ्या लोकांच्या परस्परसंवादावर आणि त्यांच्या सहकार्यावर अवलंबून असतात.

स्क्रम या मूल्यांवर आधारित आहे आणि त्यांच्या द्वारे व्यक्त केले जात आहे:

* मूल्य वर्तन ठरवतात/बनवतात. स्क्रम व्हॅल्यूज वेगळ्या प्रकारचे वागणूक सूचित करतात आणि स्क्रमचे नियम अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास आणि अंमलात आणण्यासाठी आणि जटिल परिस्थितीत जटिल कार्य करण्यात त्यांच्याकडून अधिक मूल्य मिळविण्यास आम्हाला मार्गदर्शन करतात.
* वागणूक मूल्ये प्रतिबिंबित करते. एखादी व्यक्ती अशी अपेक्षा करु शकते की जेव्हा स्क्रमचे अवलंबन जसजसे अधिक चांगले वाढते, जशी स्क्रम अधिक चांगली समजली जाते आणि अधिक अधिनियमित केले जाते तसे, स्क्रम ची मूल्ये लोकांच्या परस्परसंवादामध्ये आणि सहयोगी कामांमध्ये महत्त्वपूर्ण होत जातात. ते आपल्या स्क्रमचे मापन यंत्र आणि आरोग्य दर्शक आहेत.

स्क्रम हा नियम, तत्त्वे आणि ...**मूल्यांची** एक चौकट आहे.

## वचनबद्धता (‘Commitment’)

वचनबद्धता’ ची सामान्य व्याख्या अशी आहे की "एखादे काम अथवा कारणासाठी समर्पित असण्याची अवस्था किंवा गुणवत्ता" ही गोष्ट एखाद्या संघाचा प्रशिक्षक असे स्पष्ट करू शकतो की “मी खेळाडूंना त्यांच्या वचनबद्धतेसाठी दोष देऊ शकत नाही (जरी त्यांनी नुकताच एखादा खेळ गमावला असेल)."

स्क्रम मध्ये वचनबद्धता हे मूल्य काय आहे याचे तंतोतंत वर्णन यात सापडते.  वचनबद्धता तुमच्या समर्पणा बद्दल आहे, कृती आणि प्रयत्नांच्या तीव्रतेबद्दल आहे. हे अंतिम निकालाबद्दल नसते, कारण गुंतागुंतीच्या परिस्थितीत जटिल आव्हानामूळे, निकाल/परिणाम हे स्वतःच अनिश्चित आणि अप्रत्याशित असतात.

तरीही, वचनबद्धतेचा चुकीचा अर्थ अनेक ठिकाणी/अनेकवेळा लावला जातो. स्क्रमच्या संदर्भात, याची सुरुवात मुख्यत्वे स्क्रम फ्रेमवर्कमध्ये पूर्वी व्यक्त केलेल्या एका अपेक्षेपासून उद्भवते, जेथे संघांनी स्प्रिंटसाठी ‘वचनबद्ध’ झाले पाहिजे असा संदर्भ आहे. पारंपारिक, औद्योगिक दृष्टिकोनातून याचा चुकीचा अर्थ असा लावला गेला की स्प्रिंट प्लॅनिंगमध्ये निवडलेले सर्व कार्य स्प्रिंटच्या अखेरीस, काहीही झाले तरी, पूर्ण होईलच होईल. या मूळे "वचनबद्धता" चुकीच्या पद्धतीने एका पक्का केलेल्या आणि न बदलणाऱ्या करारामध्ये रूपांतरित केले गेले.

स्क्रम आपल्याला जिथे जाण्यात/नेव्हिगेट करण्यास मदत करते ते जटिल, सर्जनशील आणि अनिश्चित जग. तिथे अचूकपणे अंदाज लावून, वेळ आणि बजेट यांची न चुकता अचूक सांगड घालून उत्पादन होईल याचे वचन देने शक्यच नसते. कामावर परिणाम करणारे कितीतरी घटक, अज्ञात किंवा अंदाजविरुद्ध मार्गांनी समोर येऊ शकतात.

इथे, मूळ हेतू चांगल्या प्रकारे प्रतिबिंबित करण्यासाठी आणि अधिक प्रभावीपणे अनुभववादाशी जोडण्यासाठी, स्प्रिंटच्या संदर्भात ‘वचनबद्धता’ ची जागा ‘पूर्वानुमान’ ने घेतली. खरा हेतू अधिक चांगल्या प्रकारे प्रतिबिंबित करण्यासाठी, मी असे म्हणणे पसंत करतो की लोक ठरलेल्या कामासोबत ‘वचनबद्ध झाले आहेत’ याच्याऐवजी ‘वचनबद्ध होऊन पाहतात’. हे एखाद्या पूर्वानुमानित निकालाचे कठोर पणे दिलेले वचन म्हणून पाहण्यापासून दूर राहण्यास मदत करते.

आणि काहीही असले तरी, "वचनबद्धता" हे खेळाडूंचे एक महत्त्वपूर्ण स्क्रम मूल्य आहे जे खेळाडूंचे वर्तन घडवते आणि त्याला दिशा देते.

खेळाडू संघ आणि त्यातील सहकार्यासाठी वचनबद्ध असतात. ते (कामातून)शिकण्यासाठी वचनबद्ध असतात. आपले सर्वोत्तम काम करणे, दररोज करणे याची टिकून राहू शकेल अश्या वेगासोबत ची वचनबद्धता आणी बांधिलकी खेळाडू करतात. ते स्प्रिंट च्या ध्येयाकरिता प्रतिबद्ध आहेत. ते व्यावसायिक म्हणून काम करण्यास वचनबद्ध आहेत. खेळाडू स्वयंचलन करण्यासाठी वचनबद्ध होऊ पहाता. उत्कृष्टतेसाठी वचनबद्ध होऊ पहाता. अजाईल मूल्ये आणि तत्त्वे यांकरिता प्रतिबद्ध होऊ पहाता.

उत्पादनाची कार्यरत आवृत्ती तयार करण्या साठी वचनबद्ध होऊ पहाता. ती आवृत्ती पूर्ण झालेल्या परिभाषाचे अनुपालन करणारी असेत याकरिता वचनबद्ध होऊ पहाता. सुधारणा शोधण्यासाठी वचनबद्ध होऊ पहाता. स्क्रम फ्रेमवर्कसाठी वचनबद्ध होऊ पहाता. ज्याला मूल्य असेल अश्या गोष्टी बनवण्यासाठी करण्यासाठी वचनबद्ध होऊ

पाहता. काम पूर्ण करण्यासाठी वचनबद्ध होऊ पाहता. तपासणी आणि परिस्थितीशी जुळवून घेण्यास, तपासणी नंतर लागणारी अनुकूलन करण्यासाठी वचनबद्ध होऊ पाहता. पारदर्शकतेसाठी वचनबद्ध होऊ पाहता. यथास्थितीस चिटकून न राहता तिला आव्हान देण्यास वचनबद्ध होऊ पाहता.

## लक्ष (‘Focus’)

संतुलित परंतु वेगळी जबाबदारी, स्क्रम मध्ये, सर्व खेळाडूंना त्यांच्या कौशल्यांवर, आवडींवर आणि प्रतिभेवर लक्ष केंद्रित करण्यास सक्षम करते. महत्त्वाकांक्षा आणि उद्दीष्टांवर लक्ष केंद्रित करण्यामुळे खेळाडूंना त्यांचे कौशल्याना एकत्रित, विस्तृत आणि सुधारित करण्याचे आमंत्रण मिळते.

स्क्रम मधील टाईमबॉक्सिंग खेळाडूंना एक अत्यंत चांगले प्रोत्साहन देते जिथे ते आता (ह्या क्षणी) सर्वात महत्त्वाच्या असलेल्या गोष्टीवर लक्ष केंद्रित करतात ऐवजी की इतर गोष्टी ज्या भविष्यात महत्त्वपूर्ण ठरण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. त्यांना आता काय माहित आहे यावर ते लक्ष केंद्रित करतात. याग्नी (YAGNI: 'You Ain't Gonna Need It') ‘आपणास याची गरज नाही’, लक्ष टिकवून ठेवण्यास मदत करते. भविष्यकाळ हे अत्यंत अनिश्चित आहे म्हणूनच भविष्यात गरज भासणाऱ्या कामाचा अनुभव घेण्यासाठी त्यांना वर्तमानातून शिकायचे आहे यावर खेळाडू लक्ष केंद्रित करतात.

गोष्टी पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या कामावर ते लक्ष केंद्रित करतात. खेळाडू सोप्या /गुंतागुंत नसलेल्या गोष्टी ज्या शक्यतो काम करतील त्यावर लक्ष केंद्रित करतात.

स्प्रिंट चे ध्येय खेळाडूंना 4 आठवडे किंवा त्यापेक्षा कमी कालावधीसाठी लक्ष केंद्रित करण्यासाठी देते. त्या कालावधीत, दैनिक स्क्रम लोकांना स्प्रिंट उद्दीष्ट्यासाठी शक्य तितक्या चांगल्या प्रगतीसाठी आवश्यक असलेल्या त्वरित दैनंदिन कार्यावर सहकार्याने लक्ष केंद्रित करण्यास मदत करते. प्रॉडक्टची जी लक्ष्ये असतात ती अनेक स्प्रिंटस च्या मधून लक्ष केंद्रित करण्यासाठी त्याकरिता योग्य दिशा शोधण्यात आणि ती पुढे तशीच ठेवण्यात मदत करतात.

## मोकळेपणा (‘Openness’)

प्रायोगिक तत्वांचा वापर करून अनुभवावर आधारित शिकत जाणाऱ्या स्क्रम साठी पारदर्शकता, मोकळेपणा आणि प्रामाणिकपणा आवश्यक आहे. अनुकूल निर्णय घेण्याकऱता गटातील खेळाडु सद्य परिस्थितीची चाचपणी, तपासणी करतात. खेळाडू (म्हणजे कार्य करणारे लोक) त्यांचे कार्य, कार्याची प्रगती, त्यातून लक्षात आलेले/मिळालेले धडे आणि समोर असलेल्या समस्या याबद्दल मोकळेपणाने व्यक्त होत राहतात.

लोकांसोबत कार्य करण्यासाठी ते तयार आहेत, ते करताना कामाच्या मानवी (लोक आधारित) पैलू करता ते खुले आणि सजग आहेत. ते लोकांना लोक म्ह्णून पाहता, लोकांकडे संसाधने किंवा मशिन्स म्हणून नाही. लोक म्हणजे एखाद्या मशीनची बद्दलण्यायोग्य तुकडे नाहीत याची त्यांना जाणीव आहे. वेगवेगळ्या कौशल्य, कामाचे प्रकार यांना ओलांडून(सामावून) त्यात सहयोग करण्यासाठी, सहभाग घेण्यासाठी ते खुले आणि तयार आहेत. भागधारक तसेच संस्थेतील इतर विस्तारलेले घटक/संघ यांच्या सोबत सहयोग करण्यासाठी, सहभाग घेण्यासाठी ते खुले आहेत.

एकमेकांकडून शिकण्यात आणि एकमेकांना अभिप्राय सादर (तथा ग्रहण) करण्याकरता ते खुले व तयार आहेत. आपण वावरतो/काम करतो ते जग/ संघटना(संस्था) यांच्या अप्रत्याशित, अनपेक्षित आणि बदलणाऱ्या रुपाकरता खेळाडू खुले आणि तयार आहेत.

## आदर ('Respect')

लोकांबद्दलचा, लोकांच्या अनुभवाचा आणि त्यांच्या वैयक्तिक पार्श्वभूमीचा आदर यावर स्क्रम ची विस्तृत प्रणाली उत्कर्ष पावते. खेळाडू विविधतेचा आदर करतात. ते भिन्न भिन्न मतांचा आदर करतात. ते एकमेकांच्या कौशल्यांचा, विशेषज्ञता आणि अंतर्दृष्टीचा आदर करतात.

ते संघटने मध्ये एकट्याने व्यवहार न करता व्यापक वातावरणाचा आदर करतात. ते ह्या सत्याचा आदर करतात की ग्राहक त्यांचे मत बदलतो. ते प्रायोजकांकरता ते असे कार्य किंवा उत्पादन जे वापरले जात नसेल ते बनवून किंवा टिकवून ठेवत नाही, ज्यामुळे उत्पादनाची एकूण किंमत वाढते, असे करून ते प्रायोजकांसाठी आदर दर्शवतात. ज्या गोष्टी मौल्यवान नाहीत, ज्यांची प्रशंसा होण्यायोग्य नाही किंवा कधीही अंमलात येऊ किंवा कधीही वापरल्या जाणार नाहीत अशा गोष्टींवर पैसा वाया न घालवून ते आदर दर्शवतात. वापरकर्त्यांच्या समस्येचे निराकरण करून ते वापरकर्त्यां करता आदर दर्शवतात.

सर्व खेळाडू स्क्रम फ्रेमवर्कचा आदर करतात. ते स्क्रमच्या उत्तरदायित्वांचा आदर करतात.

## धैर्य ('Courage')


कोणालाही नको असलेली वस्तू न बनवून खेळाडू धैर्य दाखवतात. आवश्यकते बद्दल ची माहिती कधीही परिपूर्ण नसेल आणि कोणतीही योजना वास्तविकता आणि गुंतागुंत यांना पकडू शकत नाही हे स्वीकार करून धैर्य दाखवतात.

बदलाला प्रेरणा आणि नावीन्यपूर्णतेचा स्त्रोत म्हणून समजण्याचे ते धैर्य दाखवतात. उत्पादनाची अर्धवट आवृत्ती वितरीत न करून ते धैर्य दाखवतात. आपल्या संघास व संस्थेस मदत करेल ती सर्व संभाव्य माहिती सामायिक करण्याचे धैर्य ते दाखवतात. कोणीही परिपूर्ण नाही हे स्वीकार करण्याचे धैर्य. दिशा बदलण्याचे धैर्य. जोखीम आणि फायदे सामायिक करण्याचे धैर्य. भूतकाळातील कल्पित निश्चितता सोडणे हे धैर्य.

जटिलतेस सामोरे जाण्यासाठी खेळाडू स्क्रम, स्व- संघटन आणि अनुभववाद वाढवून धैर्य दाखवतात.

एखादी गोष्ट उगाळत बसण्यापेक्षा ते निर्णय घेण्याची, कृती करण्याची आणि प्रगती करण्याची हिंमत दाखवतात, आणि त्या निर्णयामध्ये बदल करण्याची तयारी ठेवून त्याहून आणखी धैर्य दाखवतात.

ते स्क्रम व्हॅल्यूजचे समर्थन आणि अवलंबन करण्याचे सुद्धा धैर्य दर्शवतात.


“स्क्रम, प्रत्यक्षात, प्रक्रियेपेक्षा
व्यवहाराबद्दल अधिक आहे.”
Gunther Verheyen